**आरबीआय /२००४-०५/२६८**
**आरपीसीडी. सीओ. आरएफ. बीसी. ५५/०७.३८.०१/२००४-०५**

१ नोव्हेंबर २००४

सर्व राज्ये तसेंच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका,

माननीय महोदय,

**२००४-२००५ साठीच्या वार्षिक पतधोरणाचा मध्यावधी आढावा**
**देशांतर्गत तसंच सामान्य अनिवासी नागरिकांच्या मुदत ठेवींचा नियत अवधि कमी करण्याविषयी**

कृपया संदर्भासाठी आमच्या परिपत्रकातल्या परिच्छेद १(१) चा वापर करावा.
आरपीडीसी. क्रमांक आरएफ. डीआयआर. बीसी. ७७/०७.३८.०१ (दिनांक १९ अप्रिल २००१)

सात दिवसांच्या मुदत समाप्तीच्या कालावधीसाठी बँका सध्या १५ लाख रुपये किंवा त्यापेक्षा अधिक रकमेच्या मुदत ठेवी स्वीकारु शकतात; तर १५ लाखाहून कमी रकमेसाठी, मुदत समाप्तीचा कालावधी किमान १५ दिवसांचा असावा लागतो.

२. यासंदर्भात आम्ही रिझर्व बँकेच्या वार्षिक पतधोरणाच्या मध्यावधी आढाव्यातल्या ७३व्या तसेच ७४व्या परिच्छेदाचा उल्लेख करु इच्छितो (प्रत सोबत जोदली आहे). मध्यावधी धोरणात म्हंटल्याप्रमाणे वर दिलेल्या मार्गदर्शक तत्वांचे पुनरावलोकन केल्यानंतर, आम्ही असा असा निर्णय घेतला आहे की, मुदत ठेवींच्या नियत अवधिमध्ये एकसूत्रता आणण्यासाठी, बँका आपल्या अधिकारक्षेत्रात, १५ लाखाहून कमी असणाऱ्या  देशांतर्गत तसेच अनिवासी मुदत ठेवींचा मुदत समाप्तीचा कालावधी, १५ दिवसांहून ७ दिवसांवर आणू शकतात. मात्र असे असले तरीही, १५लाख किंवा त्यापेक्षा अधिक रकमेच्या मुदत ठेवींवर किती व्याज आकारायचे हे ठरवण्याचा अधिकार सर्वस्वी त्या बँकेचा राहील. नवीन नियमावली १ नोव्हेंबर २००४ पासून अंमलात येईल.

३. कृपया या परिपत्रकाची पोच आमच्या संबंधित कार्यालयाला द्यावी.

आपला विश्वासू,

(जी.श्रीनिवासन)
मुख्य महाव्यवस्थापक

सहपत्रः वरिलप्रमाणेच

**व्याज दर धोरण**

क) देशांतर्गत मुदत ठेवींचा नियत अवधि कमी करणे.

७३. देशांतर्गत ठोक मुदत ठेवींच्या किमान मुदत समाप्तीचा अवधी सद्य स्थितीला (१५ लाख किंवा त्यापेक्षा अधिक रकमेसाठी ) ७ दिवस आहे, तर किरकोळ मुदत ठेवींच्या नियत अवधिमध्ये सुसूत्रता आणण्यासाठी खाली दिल्याप्रमाणे प्रस्ताव मांडण्यात येत आहेः

बँका आपल्या अधिकारक्षेत्रात किरकोळ मुदत ठेवींच्या (१५ लाखांहून कमी रकमेसाठी ) मुदत समाप्तीचा किमान नियत अवधि, १५ दिवसांवरून ७ दिवसांवर आणू शकतात.

७४. पण असे असले तरीही, सद्य परिस्थितीप्रमाणेच, ठोक मुदत ठेवीवर (१५ लाख किंवा त्याहून अधिक रकमेसाठी ) आपल्याला हवा तो व्याजदर आकारण्याचा अधिकार सर्वस्वी त्या बँकेचा राहिल.